महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल: cpromhadaoffice@gmail.com


म्हाडा MHADA

=====================================================================

जावक क्रमांक –०५/३०४८९६०  दिनांक :- ०३ फेब्रुवारी, २०२६

<u>प्रसिद्धिपत्रक</u>

# म्हाडाचा १५ वा लोकशाही दिन ९ फेब्रुवारी रोजी

**म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांच्या तक्रारींवर चर्चा व तात्काळ निर्णय**

मुंबई, दि. ०३ फेब्रुवारी, २०२६ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) पंधरावा लोकशाही दिन सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपासून 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात चौथ्या मजल्यावरील सभागृहात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे.

म्हाडा प्रशासनाद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, जानेवारी-२०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील सभागृहात म्हाडा लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करून घ्यावे. आजतागायत म्हाडामध्ये चौदा लोकशाही दिन कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

लोकशाही दिनांतर्गत नागरिकांच्या प्राप्त तक्रारी अर्जांवर संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत थेट व खुली चर्चा केली जाते. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात आली असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि त्वरित न्याय मिळत आहे. या उपक्रमामुळे म्हाडा प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकांप्रती संवेदनशील बनले असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. प्रत्येक लोकशाही दिन कार्यक्रमापूर्वी श्री. जयस्वाल यांच्याकडून यापूर्वी झालेल्या लोकशाही दिनातील प्रकरणांवर अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कार्यवाहीचा देखील आढावा घेण्यात येतो. यामुळेच तसेच लोकशाही दिन हा नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचा मजबूत दुवा ठरत आहे.

म्हाडा प्रशासनाद्वारे कळविण्यात येत आहे की, लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी तक्रार अर्ज विहित नमुन्यात असावा. म्हाडा लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर २ प्रतींत पाठविणे आवश्यक राहील. सदर नमूना अर्ज म्हाडाच्या https://mhada.gov.in संकेतस्थळावर नागरिकांसाठी या अंतर्गत लोकशाही दिन या सदरात उपलब्ध आहे. अर्जदाराची तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसतील असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत. जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी आठ दिवसात पाठवण्यात येतील व त्याची प्रत अर्जदारास देखील पाठविण्यात येईल.

###

(स्वाक्षरीत/-)
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 05/3048960 Dt. 3 February 2026

**Press Release**

**MHADA's 15 th Lokshahi Din on 9th February**

Discussion and Immediate Redressal of Citizens' Grievances under the Chairmanship of MHADA Vice President

Mumbai, 3 February, 2026 : Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), the leading housing authority of the nation, will be organizing its 15th "Lokshahi Din" on +Monday, 9th February, 2026, at 12:00 noon in the conference hall on the 4th floor of MHADA's headquarters at Bandra (East). The program will be chaired by MHADA Vice President and Chief Executive Officer, Mr Sanjeev Jaiswal.

MHADA Administration appeals to citizens that from January 2024 onwards, MHADA Lokshahi Din is being organized on the second Monday of every month at the auditorium of MHADA Headquarters, Bandra (East). Citizens are urged to participate in large numbers in this initiative and get their grievances resolved promptly. So far, fourteen Lokshahi Din programmes have been successfully organized in MHADA under the chairmanship of MHADA Vice President and Chief Executive Officer, Shri Sanjeev Jaiswal.

During Lokshahi Din, citizens' applications and grievances are taken up for open and direct discussion in the presence of the concerned officers. This initiative has enabled the prompt resolution of long-pending cases and has ensured that citizens receive simple, transparent, and speedy justice. The program has helped build public confidence that MHADA's administration is becoming more transparent, accountable, and sensitive towards citizens. Before each Lokshahi Din, Shri Jaiswal also reviews the action taken by officers on the cases discussed in the previous sessions. This practice has made Lokshahi Din a strong bridge of trust between citizens and the administration.

MHADA appeals to citizens that to participate in Lokshahi Din, the complaint application must be in the prescribed format. For Lokshahi Din at MHADA, the applicant must submit the application in the prescribed format, in two copies, at least 15 days in advance. The applicant's complaint or representation should be of a personal nature.

The prescribed application format is available for citizens under the "Lokshahi Din" section on MHADA's website: https://mhada.gov.in. Cases under judicial consideration, revenue/appeal matters, service-related or establishment matters, applications not submitted in the prescribed format, applications without the necessary supporting documents, cases already disposed of or in which a final reply has been given/shall be given, and applications that are not of an individual grievance nature will not be accepted on Lokshahi Din. Such applications, which cannot be entertained under Lokshahi Din, will be forwarded to the concerned department for necessary action within eight days, and a copy of the same will also be sent to the applicant.

###

(Sd/-)
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial